# महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**

**३रा मजला, साखर भवन, रामनाथ गोयंका मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.**

**दूरध्वनी क्रमांक : ०२२-४०४४ १०००; Email: mhdc.mahahousing@maharashtra.gov.in**

## सूचना

महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सोलापूर, नागपूर, बारामती येथे गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येत असून तसेच महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आगामी कालावधीत गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याचे महामंडळामार्फत प्रयोजित आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ या कार्यालयातील विविध नमूद पदे शासकीय कार्यालये/ शासकीय उपक्रम/ संविधिक संस्था/ मंडळे/ महामंडळे /स्थानिक स्वराज्य संस्था मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षाच्या कालावधीकरिता भरण्यासाठी तसेच खाजगी क्षेत्रातून प्राप्त अर्जांमधून पात्रता व अनुभवाच्या आधारे अधिकारी व कर्मचारी पदांवर कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीकरिता भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेकरिता दि.१५.०७.२०२६ रोजी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिरातीप्रमाणे दि.२६.०७.२०२६ पर्यंत उपरोक्त नमूद पत्त्यावर किंवा **mahahousingrecruitment**@gmail.com या ई-मेल आयडीवर विहीत केलेल्या नमुना अर्जाप्रमाणे प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह अर्ज मागविण्यात आले होते. सदरील जाहिरातीस दि.०५.०८.२०२६ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

उमेदवाराची गुणवत्ता व पदासाठीचा अनुभव विचारात घेऊन त्यांची सदर पदाकरिता निवड निश्चित करण्याचे व त्यांचे दरमहा ठोक पारिश्रमिक निश्चित करण्याचे अधिकार महामंडळास राहतील. सदर पदभरतीबाबतची विस्तृत माहिती, पात्रता निकष व अटी व शर्ती, तसेच अर्जाचा विहित नमुना इ. **https://mahahousing.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उक्त पदे महामंडळाच्या आवश्यकतेनुसार अंतिम निवड यादीतून भरण्यात येतील. त्याचप्रमाणे सदर भरती प्रक्रियेबाबत सुधारणा असल्यास त्याबाबत सविस्तर शुध्दीपत्रक/सूचना या महाहौसिंगच्या अधिकृत संकेतस्थळावरुन वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.

**सही/-**

**(त्र्यंबक कासार)**

**व्यवस्थापकीय संचालक तथा मुकाअ**